नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १९७ Issue - 197 | वार बुधवार दि. ४ डिसेंबर २०२४ Blow- Wednesday Date 4 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

थोडक्यात

चकमकीत 'लष्कर'चा दहशतवादी ठार

श्रीनगर : लष्कर-ए-तैयबाचा दहशतवादी जुनैद अहमद भट याला चकमकीत ठार करण्यात आल्याची माहिती जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी मंगळवारी दिली. जम्मू आणि काश्मीरमधील सोनमर्गजवळ गगनगीर येथे झेड-मोढ बोगद्याचे बांधकाम करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांमध्ये भटचा समावेश होता असे पोलिसांनी सांगितले. २० ऑक्टोबरला झालेल्या त्या दहशतवादी हल्ल्यात बांधकाम कंपनीच्या सात कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. श्रीनगर शहराबाहेर असलेल्या दाचिगाम जंगलामध्ये दहशतवादी वावरत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस आणि सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकाने सोमवारी संध्याकाळी जंगलाची घेराबंदी केली. तेथे दहशतवाद्यांचा शोध घेतला जात असताना जवानांवर गोळीबार झाला. त्यांनी त्याला उत्तर दिले. या चकमकीत भट ठार झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. गगनगीर घटनेचा तपास करताना सीसीटीव्ही चित्रण तपासताना पोलिसांना दोन हल्लेखोरांपैकी जुनैद भटची ओळख पटली होती. तो दक्षिण काश्मीरमधी कुलगाम येथील रहिवासी असून तो 'अ' सूचितील दहशतवाद्यांपैकी एक असल्याचे सांगण्यात आले. जम्मू-काश्मीर पोलिसांनी एक्सवरून या चकमकीची माहिती दिली. जुनैद भट हा गगनगीर, गांदरबल आणि इतर अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्ये सहभागी होता असे त्यांनी त्यामध्ये स्पष्ट केले. भटच्या ताब्यात अमेरिकी बनावटीची एम-४ कार्बाईन ताब्यात घेण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

सत्ता स्थापनेचा तिढा सुटणार?

५ डिसेंबर रोजी नव्या सरकारचा शपथविधी सोहळा : एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीसांच्या भेटीवरून चर्चांना उधाण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन करण्यासाठी नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. ५ डिसेंबर रोजी नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असल्याचंही सांगितलं जात आहे. मात्र, हे सर्व सुरु असताना विधानसभेचा निकाल लागून आठ दिवस झाले तरी अद्याप सरकार स्थापन न झाल्यामुळे महायुतीत सर्व काही अलबेल नसल्याची चर्चा आहे. यातच महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या

राष्ट्रवादीत मंत्रिमदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. तसेच एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यास भाजपा तयार नसल्याचं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर बैठक देखील पार पडली होती. मात्र, या बैठकीनंतरही महायुतीमधील तिढा सुटला नाही अशी चर्चा आहे. यातच एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून आजारी आहेत. तसेच त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचार घेतल्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर आज एकनाथ शिंदे हे वर्षा या निवासस्थानी दाखल झाले.

वर्षा निवासस्थानी दाखल झाल्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: वर्षा निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदेंची भेट घेतली. या भेटीत एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जवळपास आर्धा तास चर्चा झाली. त्यामुळे या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? याचा तपसील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, या भेटीनंतर तरी महायुतीतील तिढा सुटणार का? मंत्रिपदांचा आणि खातेवाटपाचा तिढा सुटणार का? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. दरम्यान, शिंदे आणि फडणवीसांच्या भेटीवरून शिंदे गटाचे प्रवक्ते किरण पावसकर यांनी प्रतिक्रिया देत फडणवीसांनी भेट का घेतली? याविषयी माहिती सांगितली आहे. एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. महायुतीमध्ये कधीही नाराजी नव्हती आणि नाही. नाराजीचा काही प्रश्न नाही. एकनाथ शिंदे यांची तब्येत व्यवस्थित नव्हती. त्यामुळे ते रुग्णालयात दाखल झाले होते. मात्र, माध्यमात चर्चा झाल्या की ते नाराज आहेत. महाराष्ट्रातील जनतेने भरभरून एवढं त्यांना मतदान केलं. तसं येणारा कार्यक्रम देखील मोठा व्हावा आणि त्यामध्ये शिवसेना देखील असणार आहे, असं किरण पावसकर यांनी म्हटलं. देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांची आज वर्षा या निवासस्थानी जाऊन भेट घेतली.

ट्रॅक्टर विहिरीत कोसळून तीन बालकांचा बुडून मृत्यू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : ऊसतोड मजुरांची ट्रॅक्टर ट्रॉली शेतातील विहिरीत कोसळून ऊसतोड मजुरांची तीन बालके मृत्युमुखी पडली. माढा तालुक्यातील शिंगेवाडी शिवारात सकाळी ही दुर्घटना घडली. अपघातग्रस्त ट्रॅक्टर नेहमीच्या चालकाऐवजी ऊसतोड मजूर टोळीचा मुकादम चालवत होता. त्याच्यावर कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

अपघातातील तिन्ही मुलांचे पालक नंदूरबार जिल्ह्यातील आहेत. रिंकू सुकलाल वसावी (वय ३), नीतेश शिवा वसावी (वय ३) आणि आरव पाडवी (वय ४) अशी मृत बालकांची नावे आहेत. हयगयीने, अविचाराने, धोकादायकरीत्या ट्रॅक्टर चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी ऊसतोड मजुरांचा मुकादम खिमजी जालम्या तडवी याच्याविरुद्ध ऊसतोड मजूर सुखलाल करपा वसावी (रा. पिंपळवाडी, ता. धडगाव, जि. नंदूरबार) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल झाला आहे. अपघात घडताच खिमजी तडवी याने स्वत:चा जीव वाचवत पलायन केले. सुखलाल वसावी हे शिंगेवाडी शिवारात ऊसतोड मजूर म्हणून आले होते. ऊसतोडीसाठी ट्रॅक्टरला (एमएच ४५ ४७५३) ट्रॉली जोडून मुकादम खिमजी तडवी हा सुखलाल यांची पत्नी सायकू वसावी, मुलगी रिंकू, ऊसतोड जोडीदाराची पत्नी निमा शिवा वसावी, तिचा मुलगा नीतेश, तिला वसंत पाडवी आणि तिचा मुलगा आरव पाडवी यांना घेऊन निघाला होता. मुकादम खिमजी स्वतः ट्रॅक्टर चालवत होता. नागनाथ शिंदे यांच्या शेतात ट्रॅक्टरने तेथील विहिरीला ठोकरले. कठडे तोडून ट्रॅक्टर विहिरीत कोसळला. या वेळी पुरुष मजूर पोहून पाण्यातून बाहेर आले. स्त्रियांनाही पाण्यातून बाहेर काढून वाचविण्यात आले. परंतु त्यांची तिन्ही मुले पाण्यात बुडाली. ग्रामस्थांनी अपघातग्रस्त ट्रॅक्टर जेसीबीच्या साह्याने बाहेर काढला. विहिरीतील पाणी विद्युत मोटारीने उपसण्यात आले. अखेर विहिरीच्या तळात दुर्दैवी बालके सापडली. त्यांना तातडीने नजीकच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच तिघांचाही मृत्यू झाला.

महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने स्पष्ट बहुमत प्राप्त करत अभूतपूर्व यश संपादन केले. महायुती सरकारचा शपथविधी सोहळा गुरुवार, ५ डिसेंबर रोजी दक्षिण मुंबईतील मुंबई महानगरपालिका मार्गावरील आझाद मैदानात होणार आहे. या पार्श्वभूमीवर आझाद मैदान परिसरासह मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. सुमारे ५ हजार पोलीस आझाद मैदान परिसरात तैनात राहणार असून त्यामध्ये जवळपास चार ते साडेचार हजार पोलीस अंमलदारांचा समावेश असेल. तसेच, २ दंगल नियंत्रण पथक, तसेच बॉम्बशोधक व नाशक पथकेही असणार आहेत.

महायुती सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदानात एकूण तीन व्यासपीठ उभारण्यात येणार आहेत. मुख्य व्यासपीठावर पंतप्रधानांसह मुख्यमंत्री व इतर मंत्र्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच इतर दोन व्यासपीठांवर लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रातील मान्यवर असतील. महायुती सरकारच्या भव्य शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय मंत्री, इतर राज्यांचे मुख्यमंत्री तसेच विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या सर्व मान्यवरांच्या (व्हीआयपी आणि व्हीव्हीआयपी) आगमन मार्गांवर कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. या मार्गांवर पोलीस अधिकारी, गृहरक्षक दल, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक तैनात असतील. तसेच या मार्गांवर वाहतूक पोलिसही असणार आहेत. त्यामध्ये सुमारे १४४ वाहतूक पोलीस अधिकारी आणि १ हजार पोलीस अंमलदारांचा समावेश असेल. तसेच, मुंबईतील मुख्य रस्त्यांवर साध्या वेशातील पोलीस अधिकारीही तैनात असतील, अशी माहिती सूत्रांनी व अधिकाऱ्यांनी दिली.

शपथविधीसाठी मुंबई महानगरपालिकाही सज्ज

आझाद मैदानावर गुरुवारी होणाऱ्या शपथविधीसाठी मुंबई महापालिका प्रशासनानेही तयारी केली आहे. आझाद मैदान राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे. त्यामुळे पालिकेने या शपथविधीसाठी सेवा-सुविधा उपलब्ध केल्या आहेत. आझाद मैदानाच्या आजूबाजूच्या रस्त्यांची डागडुजी, वाहतूक चिन्हे व रेषा यांची रंगरंगोटी, दुभाजकांची रंगरंगोटी, पाणीपुरवठा, शौचालये आदी सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच मैदान परिसरातील झाडांच्या वाढलेल्या फांद्याच्या छाटणीचे काम होती घेण्यात आले आहे. मैदानातील कचरा आणि राडारोडा हटवणे, अतिक्रमण निर्मूलन इत्यादी कामाना वेग आला असल्याची माहिती पालिकेच्या ए विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिली. तसेच वाहतूक पोलिसांच्या सूचनांनुसार या भागात सोयी - सुविधा देण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आझाद मैदान परिसरात पोलीस अधिकाऱ्यांची मोठी फौज

शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदान परिसरात पोलीस अधिकाऱ्यांची मोठी फौज असणार आहे. याठिकाणी एक सह पोलीस आयुक्त, तीन अपर पोलीस आयुक्त, सहा पोलीस उपायुक्त, १६ सहाय्यक पोलीस उपायुक्त आणि सुमारे ६०० पोलीस अधिकारी तैनात असणार आहेत, अशी माहिती सूत्रांनी व अधिकाऱ्यांनी दिली.

निवडणुकीत आम्हाला थर्ड अम्पायर दिला असता तर निर्णय बदलले असते : राज ठाकरे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खालल्यानंतर राज ठाकरेंनी एक्सद्वारे केवळ तीन शब्दांत प्रतिक्रिया दिली होती. अविश्वसनीय.. तुर्तास इतकेच, असं म्हणत त्यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाविषयीची नाराजी उघड केली होती. निकाल लागून आता जवळपास दहा दिवस झाले तरी राज ठाकरे कुठेही व्यक्त झाले नव्हते. दरम्यान, आज त्यांनी क्रिकेट प्रशिक्षक रमाकांत आचरेकर यांच्या स्मारक उद्घाटनावेळी निकालाविषयीची खदखद अगदी थोडक्यात बोलून दाखवली.

रमाकांत आचेरकर यांचं स्मारक याच्याआधीच व्हायला हवं होतं. आचरेकर सरांनी जेवढे खेळाडू भारतासाठी तयार केले तेवढ्या इतर कोणत्या कोचने केले असतील, असं मला वाटत नाही. खरंतर रस्ते, फ्लायओव्हरसाठी अशा लोकांची नावे दिली पाहिजेत. आज क्रिकेट जसं बदललं. तसं सगळ्याच गोष्टी बदलल्या. आजही नवीन मुलं सांगतात की आम्हाला सचिन तेंडुलकर आणि विनोद कांबळींसारखं खेळता येत नाही, असं राज ठाकरे म्हणाले.

तुमच्याकडे क्रिकेट बदलत गेलं, तसं आमच्याकडे राजकारण बदलत गेलं. तुमच्याकडे अम्पायरने आऊट दिल्यावर थर्ड अम्पायर असतो. गेल्या निवडणुकीत आम्हाला थर्ड अम्पायर दिला असता तर निर्णय बदलले असते, वेगळे दिसले असते, अशी खंत राज ठाकरेंनी व्यक्त केली.

राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत १२८ उमेदवार उभे केले होते. अमित ठाकरेही यंदा माहीम विधानसभा मतदारसंघातून पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. राज ठाकरेंनी अनेक उमेदवारांकरता जोरदार सभा घेतल्या. त्यांच्या सभांना तुफान गर्दीही झाली होती. अमित ठाकरेंनी तर घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला होता. त्यामुळे यंदा मनसेच्या पारड्यात काही जागा पडतील, अशी आशा व्यक्ती केली गेली. परंतु, निवडणूक निकालाच्या दिवशी मनसेचा सुपडा साफ झाल्याचं स्पष्ट झालं. २०१९ च्या निवडणुकीत मनसेला निदान एक जागा तरी मिळाली होती. परंतु, २०२४ ला मनसेला एकही जागा मिळवता आली नाही. तेव्हापासून राज ठाकरेंनी मौन पाळलं होतं. मधल्या काळात मनसेच्या अनेक नेत्यांनी ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. पण राज ठाकरेंनी अद्यापही या निकालावर खुलेपणाने संवाद साधलेला नाही.

१९ राज्याचे मुख्यमंत्रीही राहणार उपस्थित

भाजपा नेते प्रसाद लाड यांनी दिली माहिती

शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदींसह ९ केंद्रीय मंत्र्यांची उपस्थिती

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमताने विजय मिळाला आहे. भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षांनी दोनशेहून अधिक जागा, तर भाजपाने एकट्याने १३० पेक्षा जास्त जागा जिंकल्या आहेत. या ऐतिहासिक विजयानंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापन केले जाणार आहे. यासाठी महायुतीच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी ५ तारखेला मुंबईतील आझाद मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या तयारीला सध्या वेग आला असून आज (३ डिसेंबर) शपथविधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी भाजपाच्या नेत्यांची बैठकदेखील झाली. या बैठकीनंतर या शपथविधी सोहळ्याला नेमकं कोण-कोण उपस्थित असणार याबद्दल भाजपाचे नेते प्रसाद लाड यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

शपथविधी सोहळ्याला कोणते नेते आणि मंत्री उपस्थित राहणार यावर बोलताना प्रसाद लाड म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा, शिवराज सिंह चव्हाण, नितीन गडकरी असे नऊ ते दहा केंद्रीय मंत्री येतील. त्याबरोबरच १९ राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या शपथविधीला येणार आहेत.

याबरोबरच सर्वधर्मीय गुरूवर्य, साधुसंतदेखील आशीर्वाद देण्यासाठी या कार्यक्रमाला येणार आहेत. याशिवाय पाच ते दहा हजार लाडक्या बहिणी येतील, त्यांची वेगळी बसण्याची

सोय केली आहे. मुंबईतील हाऊसिंग सोसायटींचे चेरमन-सेक्रेटरी असे पाच हजार लोक येतील. कार्यकर्ते आणि दोन ते अडीच हजार शेतकरी वेगवेगळ्या भागातून येणार आहेत . वारकरी, डब्बेवाले येणार आहेत आणि ४० ते ५० हजारांहून कार्यकर्ते सभास्थळी दिसतील. असेही प्रसाद लाड यांनी स्पष्ट केले. शपथविधी कार्यक्रमाच्या तयारीविषयी बोलताना लाड पुढे म्हणाले की, आझाद मैदान येथे आम्ही ४० हजार खुर्च्यांचा बंदोबस्त केला आहे. त्याव्यतिरिक्त दोन हजार व्हीव्हीआयपी आणि व्हीआयपींची वेगळी व्यवस्था केली आहे. हा एक अभूतपूर्व सोहळा संपूर्ण देशात पाहायला मिळेल. महाराष्ट्रात जेथे एलईडी स्क्रीन आहेत तेथे हा सोहळा लाईव्ह दाखवला जाईल.

प्रसाद लाड यांना उद्धव ठाकरेंना शपतविधी सोहळ्याचे निमंत्रण दिले जाणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना लाड म्हणाले, हा प्रश्न तुम्ही जीएडींच्या सेक्रेटरींना विचारला तर बरं होईल. पण नियमानुसार माजी मुख्यमंत्री म्हणून त्यांना सरकारच आमंत्रित करतं. येणं न येणं का कोतेपणा दाखवणं हा त्यांचा प्रश्न आहे, असे उत्तर लाड यांनी दिले.

संपादकीय....

तिढा सुटणार?

विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळाल्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन करण्यासाठी नेत्यांमध्ये हालचाली सुरु आहेत. ५ डिसेंबर रोजी नव्या सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार असल्याचंही सांगितलं जात आहे. मात्र, हे सर्व सुरु असताना विधानसभेचा निकाल लागून आठ दिवस झाले तरी अद्याप सरकार स्थापन न झाल्यामुळे महायुतीत सर्व काही अलबेल नसल्याची चर्चा आहे. यातच महायुतीत शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत मंत्रिमदावरून रस्सीखेच सुरु असल्याचं बोललं जात आहे. तसेच एकनाथ शिंदे हे गृहमंत्री पदासाठी आग्रही आहेत, तर गृहमंत्री पद सोडण्यास भाजपा तयार नसल्याचं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांची दिल्लीत गृहमंत्री अमित शाह यांच्याबरोबर बैठक देखील पार पडली होती. मात्र, या बैठकीनंतरही महायुतीम धील तिढा सुटला नाही अशी चर्चा आहे. यातच एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून आजारी आहेत. तसेच त्यांनी रुग्णालयात दाखल होत उपचार घेतल्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर आज एकनाथ शिंदे हे वर्षा या निवासस्थानी दाखल झाले. वर्षा निवासस्थानी दाखल झाल्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः वर्षा निवासस्थानी जाऊन एकनाथ शिंदेंची भेट घेतली. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये जवळपास आर्धा तास चर्चा झाली. त्यामुळे या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? याचा तपसील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, या भेटीनंतर तरी महायुतीतील तिढा सुटणार का? मंत्रिपदांचा आणि खातेवाटपाचा तिढा सुटणार का? याकडे राज्याचं लक्ष लागलं आहे.

विवाहितेचा छळ करत मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून विवाहितेचा छळ करत मारहाण केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पूजा बसवराज जाधव (वय-२७,रा.माने वस्ती,सम्राट चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती बसवराज जाधव, सासू शोभा, दीर संतोष (रा.मड्डी जवळगे,तालुका अक्कलकोट) व नणंद आश्विनी माने,पतीचे मामा भोलप्पा भंजत्री (रा.शिडशाड,इंडी,जिल्हा विजापूर,कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी या सासरी नांदत असताना पती, सासू व दिर यांनी किरकोळ कारणावरून फिर्यादीस घालून पाडून बोलून शिवीगाळ करण मारहाण केली. तसेच नणंद आश्विनी माने हिने माहेरून सोने घेऊन ये असे म्हणत टोचून बोलत शिवीगाळ केली. दरम्यान पतीचे मामा याने देखील सासरी आल्यानंतर फिर्यादी शिवीगाळ करत मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोसई.येळे हे करीत आहेत.

आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या मोबाइल ॲप

सोलापूर (प्रतिनिधी) आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सने सल्लागारांसाठी खास तयार केलेला आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या सल्लागारांच्या उत्पादकतेत एच१-एफवाय२०२५ मध्ये ३७% वाढीचा अनुभव आला.ज्यामुळे त्यांच्या कमाईतही वाढ झाली.महत्त्वाची गोष्ट म्हणजे,आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% एजंटना एकाच दिवशी त्यांचे कमिशन प्राप्त झाले.आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्स ही पहिली जीवन विमा कंपनी आहे,जी निवडक वितरकांना एकाच दिवशी कमिशन देते. कंपनीकडे २ लाखांहून अधिक इन्शुरन्स सल्लागारांचे भक्कम जाळे आहे. कंपनीचे ६१% प्रमुख सल्लागार आता ॲपचा सक्रियपणे वापर करत आहेत.हे ॲप लहान शहरे आणि गाव खेड्यांमध्ये विखुरलेल्या गुंतवणूक सल्लागारांसाठी उपयुक्त आहे.याविषयी आयसीआयसीआय प्रूडेंशियल लाइफ इन्शुरन्सच्या विपणन विभागाचे प्रमुख शोबी सॅम म्हणाले,आमचा आयप्रू एज मोबाइल ॲप इन्शुरन्स एजंटना व्यवसाय वाढवण्यास सक्षम करत आहे.एच१-एफवाय२०२५ मध्ये आम्ही पाहिलेली ३७% ची उत्पादकता वाढ याचेच एक उदाहरण आहे.त्याचबरोबर आयप्रू एज ॲप वापरणाऱ्या ९८.१% सल्लागारांना एकाच दिवशी कमिशन मिळाले.या ॲपच्या मदतीने सल्लागार नवीन व्यवसायासाठी लॉग इन करू शकतात.

शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट आणि आकांक्षा आहे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले, त्याला या सहा डिसेंबरला ६८ वर्षे पूर्ण होत आहेत. अशावेळी आपले आदर्श विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली अर्पण करीत असताना आपण त्यांच्या आंदोलनाचा कारवाँ पुढे घेऊन जाण्यासाठी काय कृतीशीलता उपयोगात आणत आहोत? ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेऊन सदरील कार्याला वेगाने गतिमान करण्यासाठी आपण आपली भूमिका पार पाडत आहोत काय? असे प्रश्न आम्ही स्वतःलाच पिंजऱ्यात उभे करून विचारले पाहिजेत. ज्यावर चिकित्सा करून उपाययोजना केल्या पाहिजेत.

आंबेडकराईट चळवळीचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता ९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये आपल्या समस्या शासन, प्रशासनासमोर मांडण्यासाठी केंद्रीय संस्था, संघटन निर्माण करावी म्हणून समाज सेवकांची बैठक बोलाविण्यात आली होती. बैठकीत डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभा असे संघटनेचे नांव सुचविले होते, ज्याला मंजुरी देण्यात आली होती. शिकवा, चेतवा आणि संघटीत करा (एर्वीलरींश, सळींरींश रपव जीसरपळीश) असे त्या संघटनेचे ब्रीदवाक्य ठरविण्यात आले होते. ज्यातून समाजातील लोकांना केवळ शिक्षित नव्हे! तर सुशिक्षित करा, आपल्या हीन अवस्थेबद्दल त्यांच्यात चीड निर्माण करून त्यांना संघटीत करावे, असा संदेश देण्यात आला. सदरील संदेशाचे मर्म अनुयायी नीट न समजू शकल्याने त्यांनी संघटीत होण्यासाठी हव्या त्या प्रमाणात प्रयत्नच केला नाही. परिणामी संघटीत न होता हक्क अधिकारासाठी लढताना ते अपयशी ठरले. उलटपक्षी हे ब्रीदवाक्य तोडून मोडून समाजासमोर प्रस्तुत करताना 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' असे म्हणताना दिसत आहेत. त्यात बामसेफ सारखे अग्रगण्य सामाजिक संघटन सुद्धा अग्रेसर आहे. त्याचीच री इतर संघटनांनी पुढे ओढल्याचे पहायला मिळत आहे. चूक कुणाकडून ही होऊ शकते मात्र किमान लक्षात आल्यावर तरी ती सुधारली पाहिजे. पुढे २० जुलै १९२४ ला ही सभा प्रत्यक्षात अस्तित्वात आली. त्यात अस्पृश्यांची समस्या म्हणजे प्रचंड हिमालय होय, असे स्पष्ट करताना या हिमालयाशी टकरा मारून डोके फोडून घेणार आहे. त्यामुळे हिमालय कोसळला नाही तरी माझे रक्तबंबाळ डोके पाहून सात कोटी अस्पृश्य लोक तो हिमालय जमीनदोस्त करण्यास एका पायावर तयार होतील व त्यासाठी प्राणार्पण करतील, असे म्हटले होते. काय आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षापूर्तीसाठी, तो समस्यांचा हिमालय जमीनदोस्त करण्यासाठी आपले योगदान देत आहोत? याची समर्पक उत्तरे शोधून समाजाला योग्य दिशेने वळविले पाहिजे.

२० जुलै १९४२ ला अ. भा. दलित वर्ग परिषदेच्या अधिवेशन प्रसंगी नागपूर येथे डॉ. आंबेडकरांनी दलित वर्गाच्या सामाजिक व राजकीय हक्क अधिकाराच्या उत्थानासाठी स्वाभिमानी चळवळ चालविली, याची दखल घेऊन भावपूर्वक मानपत्र देण्यात आले होते. त्याप्रसंगी केलेल्या हितोपदेशात शिक्षित व्हा, चळवळ करा (लढा उभारा), संघटीत व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका.' ही आमच्या जीवनाची पंचसूत्री आहे, असा संदेश दिला होता. तसेच १२ डिसेंबर १९३८ ला सुद्धा डॉ. आंबेडकरांनी पंचसूत्री संदेश दिला होता तो असा की विद्या, प्रज्ञा, करुणा, शील व मैत्री या पंचतत्त्वानुसार आपले चारित्र्य घडविले पाहिजे. ज्यातून चारित्र्य संपन्न समाजाची निर्मिती होऊ शकेल. याचे मर्म समजून घेऊन मार्गक्रमण करावे.

२४ सप्टेंबर १९४४ ला सकाळी १० वाजता मद्रास येथील प्रभात टॉकीज मध्ये रॅशनल सोसायटीच्या वतीने श्री. एस. रामनाथ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपल्या धार्मिक, सामाजिक व राजकीय आयुष्याचा पाया बुद्धिवाद हाच असला पाहिजे. या अनुषंगाने आपण स्वतःला विकसित करण्याची नितांत आवश्यकता आहे. जेणेकरून जनमत संघटीत करण्यासाठी जनतेला आपले म्हणणे पटवून दिले जाऊ शकेल.

लेखक

त्याच दिवशी म्हणजे २४ सप्टेंबर १९४४ ला दुपारी दोन वाजता मद्रास शहरातील अस्पृश्य महिलांतर्फे रायपेट्टा येथील 'वूडलँडस' इमारतीत चहा पार्टी देण्यात आली. तर 'द संडे ऑब्झर्व्हर' मद्रास या पत्राचे संपादक श्री. पी. सुब्रमण्यमनियम मुदलियार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोन्नेमर हॉटेल मध्ये दुपारचे भोजन दिले. त्यानंतर मार्गदर्शन करताना बाबासाहेब म्हणाले की, १९१७ ते १९३७ पर्यंत २० वर्षे ब्राह्मणेतर पक्ष, जस्टीस पार्टी सत्तेवर असूनही ब्राह्मणेतर पक्षाला ब्राह्मण्य नष्ट करता आले नाही. कारण ब्राह्मण वर्गातील हुकुमशहांनी धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मोक्याच्या सर्व जागा बळकावलेल्या असल्याने ब्राह्मणेतर पक्षाचे सर्व हल्ले त्यांनी नेस्तनाबूत केलेत. त्यामुळे ब्राह्मण वर्ग हा ब्राह्मणेतर वर्गाचा अनियंत्रित राज्यकर्ता म्हणून तसाच राहिला होता. हीच पुनरावृत्ती सद्यस्थितीत झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीतील परिणामावरून पहायला मिळत आहे. याची जाणीव ठेवून परिवर्तनवाद्यांनी आपली भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा हे परिमाण म्हणजे भारतीय समाज प्रबोधनाची शोकांतिकाच ठरेल असे मला वाटते.

२४ सप्टेंबर १९४४ ला सायंकाळी मद्रास इलाख्यातील शेड्युल्ड कास्टस् फेडरेशनच्या वतीने एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली मेमोरियल हॉल, पार्क टाऊन येथे अस्पृश्यांची विशाल जाहीर सभा संपन्न झाली. त्यात मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, शासनकर्ती जमात बनने हेच आमचे उद्दिष्ट व आकांक्षा आहे. हे दररोज आठवत राहावे म्हणून आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवले पाहिजे. जेणेकरून ही आकांक्षा कृतीत उतरविण्यासाठी केवढे भगीरथ प्रयत्न करावे लागतील? याची जाणीव तरी होऊ शकेल. करिता आपण आपले राष्ट्रीय स्तरावरील मजबूत संघटन निर्माण केले पाहिजे. या सर्व आशा आकांक्षांचा विचार करून आपण नेमके कुठल्या वळणावर आहोत? आपल्या पक्ष, संघटना, संस्था नेमकेपणाने काय भूमिका पार पाडत आहेत? याची चिकित्सा करून मार्गक्रमण करू शकलो तरच आपणास अनुयायी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्याचे कर्तव्य पार पाडता येईल.

१७ नोव्हेंबर १९५१ ला नाशिक येथील निवडणूक दौऱ्यातील सभेत मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, महात्मा जोतिबा फुल्यांनी ब्राह्मणेतर पक्षाची मुहूर्तमेढ रोवली होती म्हणून त्या पक्षाचे अनुयायी स्वतःला जोतिबा फुल्यांचे अनुयायी म्हणत असत, मात्र त्या काळापर्यंत नाममात्र अनुयायी राहिले होते ज्यांनी जोतिबांच्या धोरणाला तिलांजली देऊन स्वतःच्या अस्तित्वाला काँग्रेसमध्ये सामील केले होते. म्हणून बाबासाहेब आंबेडकर आत्मविश्वासाने म्हणाले की, ते एकटेच जोतिबाच्या विचारांशी एकनिष्ठ होते. म्हणून त्यांनी स्पष्ट केले की, सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला, जनतेच्या सर्वांगीण हितासाठी जोतिबा फुल्यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल. याचा विचार करता फुल्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' आणि बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारलेला 'बुद्ध आणि त्याचा धम्म' यातील सामायिकतेचे आकलन करून सत्याकडे वळले पाहिजे.

यातील समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाहीवादी तत्त्वज्ञान पुढे घेऊन जायचे असेल तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला पुण्याच्या लॉ लायब्ररी मध्ये संसदीय लोकशाहीच्या यशस्वी काम काजाच्या पूर्वावर्ती शर्तींचे विवेचन केले आहे, ते आपण समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. लोकशाहीच्या विविधतेसंबंधी बोलताना आंबेडकरांनी ग्रीकची अथेनियन लोकशाही ज्यात ५० टक्के लोक गुलाम तर ५० टक्के लोक स्वतंत्र होते. अशाप्रकारे ही लोकशाही आधुनिक लोकशाहीपासून कशी भिन्न आहे? याची जाणीव करून दिली.

लोकशाहीच्या अनुषंगाने स्पष्टीकरण देताना ब्रिटिश संविधानावर लिहिलेल्या व लोकशाहीचा सत्य आराखडा असणाऱ्या वाल्टर बेगहॉट यांच्या ग्रंथाची ज्यात 'चर्चेतून चालणारे शासन' ज्याला लोकशाही असे म्हटले होते. तसेच अब्राहम लिंकन यांनी गेट्टीसबर्ग येथील भाषणात 'लोकांचे, लोकांनी व लोकांच्यासाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.' असे स्पष्ट केले असले तरी डॉ. आंबेडकरांनी मात्र 'रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतीकारी बदल घडवून आणणा-या शासन व्यवस्थेच्या प्रकारास व पद्धतीस लोकशाही असे म्हटले आहे.

लोकशाहीच्या यशस्वी काम काजाची पहिली शर्थ म्हणजे समाजामध्ये भयानक विषमतेने पिळलेला, दडपलेला वर्ग असता कामा नये ही होय. ज्यात रक्तरंजीत क्रांतीची बीजे असतात. दुसरी शर्थ म्हणजे विरोधी पक्षाचे अस्तित्व होय. ज्यात सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या पक्षाला न मानणा-या लोकांसाठी केलेल्या प्रत्येक कृतीचे समर्थन करने अपेक्षित आहे. तिसरी शर्थ म्हणजे कायद्यासमोर सर्व समान असावेत. ज्यात शासनाचे, मुख्य कार्य प्रशासनात ढवळाढवळ किंवा भेदभाव करने हे नसून धोरण निश्चित करणे हे अपेक्षित आहे. चौथी पूर्वावर्ती शर्थ म्हणजे संवैधानिक नैतिकता होय. ज्यात संविधान म्हणजे वैध तरतुदींचा सांगाडा असून सांगाड्याचे मांस म्हणजे संवैधानिक नैतिकता होय. पाचवी शर्थ म्हणजे कायदा यशस्वी होण्यासाठी समाजातील नैतिक अधिष्ठान महत्त्वाचे असते. ज्याची तत्त्वज्ञ लास्की यांनी 'लोकशाहीत नैतिक सुस्थिती नेहमीच ग्राह्य मानावी लागते' असे स्पष्ट केले आहे. तसेच लोकशाहीला 'लोकनिष्ठेची' फारच आवश्यकता असते. लोक निष्ठा म्हणजे सर्व अन्यायाच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा होय. करिता आपल्या समस्यांबाबत आपण नेहमी जागरूक असले पाहिजे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. त्याची अंमलबजावणी होत आहे काय? याची तपासणी केली पाहिजे.

२० एप्रिल १९५४ रोजी निवडणूक प्रचारातील स्वागत समारंभात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, राष्ट्र नाशाच्या मार्गाला लागले आहे. काँग्रेसशी तडजोड करण्याची तयारी दर्शविली असती तर लोकसभेत टिकून राहणे शक्य झाले असते. परंतु धर्माप्रमाणे राजकारणातही निष्ठा बानली नाही तर तो लफंग्याचा बाजार ठरेल. विरोधी पक्षांच्या जागेवरून लोकांपुढे भिन्न दृष्टीकोन ठेवण्यासाठीच निवडणूक लढवीत आहे. याचा वर्तमान परिस्थितीत आपण विचार केला तर लफंग्याचा बाजार भरलेला आहे काय? याची शंका येते. ज्यामुळे आपली वाटचाल नेमकी कुणीकडे हा प्रश्न अनुत्तरित राहतो. म्हणून १ जुलै १९५४ ला मुंबई येथे समाजाची दिशाभूल करणा-या पुढा-यांवर कडक नजर ठेवली पाहिजे. अन्यथा 'आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते' अशी आपली स्थिती होईल. याची आंबेडकरांनी जाणीव करून दिली होती.

तसेच २४ नोव्हेंबर १९५६ रोजी काशी विद्यापीठातील भाषणात 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' या शंकराचार्यांच्या विधानाचा समाचार घेताना ब्रह्मं सत्यं आहे तर मग आपल्या ज्ञानेंद्रियांद्वारे प्राप्त झालेले ज्ञान व विज्ञानाने शोधून काढलेल्या सत्याचे काय? असा प्रश्न उपस्थित करून 'जगन्मिथ्या' हा दृष्टीभ्रम असल्याचे जाहीर करून जनसामान्यांचे डोळे उघडले. तर दुपारच्या सभेत जनतेला व भिक्खूंना संबोधित करताना 'बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की, त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे' असा आदेशयुक्त संदेश दिला होता. तर मग आपण या आदेशानुसार आचरण करतो काय? हा कळीचा मुद्दा आहे. ज्यात सर्व समस्यांची उकल करण्याची शक्ती आहे. गरज आहे ती एकत्र येऊन संपर्क प्रक्रियेत विचारांची, संदेशाची देवाणघेवाण, आदानप्रदान करताना संवादाचे सुसंवादात रुपांतर होण्यासाठी प्रयत्न करण्याची होय. करिता प्रश्न विचारण्यासाठी, समस्यांची उकल जाणून घेण्यासाठी दर रविवारी विहारात जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाचे पालन केले तरच आपणांस अनुयायी म्हणून महापरिनिर्वाण दिनी आदरांजली अर्पण करण्याचे कर्तव्य पार पाडण्यासारखे होईल. वरील विवेचनावरून असे सहज लक्षात येते की, २४ सप्टेंबर १९४४ व २४ नोव्हेंबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सकाळ, दुपार व संध्याकाळ अशा दिवसभर सभा घेऊन मार्गदर्शन केले आहे. म्हणून यातून प्रेरणा घेऊन आदर्शांच्या पावलावर पाऊल ठेवत असताना आम्ही फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या माध्यमातून २४ नोव्हेंबर २०२४ ला सकाळी सिडकोतील धम्म सेवा संघ बौद्ध विहार, दुपारी संस्थेचे कार्यालय व सायंकाळी हडकोतील त्रिरत्न बौद्ध विहारात 'बौद्धांचे आद्यकर्तव्य आहे की त्यांनी दर रविवारी बुद्ध विहारात जावे.' या विषयावर वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळांचे आयोजन केले होते. ज्यांच्या बातम्या अनेक वृत्तपत्रातून आपण वाचल्या असाव्यात. अशा कृतीशील उपाय योजनांची आपण सर्वांनी अंमलबजावणी केली तरच आपणास अभिवादन केल्याचे कर्तव्य पार पाडल्यासारखे होईल. करिता मी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना या लेखाच्या स्वरूपात त्रिवार अभिवादन करतो.

विनम्र अभिवादन!

लेखक : नॅशनल कौन्सिल मेंबर ऑफ दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) व संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र, ४३१००२.
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbmgmail.com

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणारा धारावी हा पहिला पुनर्वसन प्रकल्प

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई (प्रतिनिधी) : भारतातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये पहिल्यांदाच धारावी पुनर्विकास प्रकल्पात आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीचे सर्वेक्षण व नोंदणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी अचूक, पारदर्शक आणि कार्यक्षमपणे होणे हाच या तंत्रज्ञानाच्या वापराचा उद्देश आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रकल्पांचे सर्वेक्षण हे टोटल स्टेशन सर्व्हे आणि दस्तऐवजांची पडताळणी यांसारख्या पद्धतींवर अवलंबून होते. धारावी पुनर्विकास प्रकल्प हा भारतातील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणारा धारावी हा पहिला पुनर्वसन प्रकल्प आहे.

मात्र, धारावी पुनर्विकास प्रकल्पात ड्रोन, लाईट डिटेक्शन अँड रेंजिंग (लायडार) तंत्रज्ञान आणि मोबाईल ॲप्लिकेशन्सचा वापर करून माहिती डिजिटल पद्धतीने गोळा करण्यात येते आणि नंतर तिचे विश्लेषण केले जाते. यामुळे धारावीचे ङ्गडिजिटल ट्विनफ प्रारूप तयार होत आहे. म्हणजेच धारावीचे आभासी प्रतिरूप, जे माहितीचे सखोल विश्लेषण करण्यासाठी व निर्णय प्रक्रिया सुयोग्य करण्यासाठी उपयोगी पडणार आहे, अशी माहिती धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित अधिकाऱ्याने दिली.

लायडार हे रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारलेले आहे. वेगाने भू-स्थानिक डेटा गोळा करण्यासाठी हे ओळखले जाते. यात लेसर लाईटद्वारे अंतर मोजले जाते आणि भूभाग, इमारती आणि वस्तूंचे अचूक ३डी प्रतिरूप तयार करण्यात येते. धारावीच्या अरुंद गल्ल्यांमध्ये फिरण्यासाठी सध्या पोर्टेबल लिडार प्रणाली वापरली जात आहे. ड्रोनद्वारे आकाशातून दृश्यं टिपली जात आहेत. ज्यामुळे धारावीचे नकाशे तयार करणे आणि नियोजन सोपे होते. त्याचबरोबर, घरोघरी जाऊन डेटा गोळा करण्यासाठी मोबाईल प्सचावापर केला जात आहे. या प्समुळे माहितीची अचूकता वाढत असून त्यामध्ये कोणतीही त्रुटी राहणे किंवा डेटा गमावण्याची शक्यता कमी झाली आहे.

चळे येथे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे वतीने चळे येथे मशीनद्वारे ऊस तोडणी सुरु

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या वतीने ऊस तोडणी मशीन चळे येथे या गावात सुरू झाले आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची चेअरमन मा.आ. अभिजीत पाटील यांनी दराची कोंडी सोडवून ऊस दर ३५०३ एवढा देण्याची त्यांनी वचन दिले होते त्या पद्धतीने त्यांनी ऊस तोडणी चालू केलेली आहे.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक उमेश काका मोरे यांनी नारळ फोडून सगळे या गावात शुभारंभ केला त्यावेळी स्वाभिमानीचे नेते व संचालक सचिन पाटील, महादेव शिंदे, बबन मोरे, हरिभाऊ गायकवाड, उत्साळे येथील शेतकरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

थोडक्यात...

सोनेवाडी खुर्द येथून तरुण बेपत्ता

निफाड : निफाड तालुक्यातील सोनेवाडी खुर्द ,येथील तरुण सागर साहेबराव पवार १९ वर्ष हा दिनांक १२ /११ /२०२४ रोजी पहाटे साडेसहा च्या दरम्यान घरात कोणास काही एक न सांगता निघून गेला असून तो आज पर्यंत घरी आला नाही अशी माहिती साहेबराव पुंडलिक पवार (वडील) राहणार सोनेवाडी खुर्द ,तालुका निफाड जिल्हा नाशिक यांनी निफाड पोलीस स्टेशनला दिली आहे. सागर पवार वय १९ वर्ष हा शरीराने मजबूत असून रंगाने निमगोरा आहे ,चेहरा उभट, केस बारीक, डोळे काळे ,असून चेहऱ्यावर बारीक दाढी व मिशा आहेत, अंगात सफेद रंगाचा शर्ट असून काळी पॅन्ट, पायात सफेद रंगाचा बूट आहे तर त्याचे शिक्षण आठवीपर्यंत झाले आहे, सदर घटनेची नोंद निफाड पोलीस स्टेशनला करण्यात आली असून पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन.एन.साळवे हे करीत आहे, तरी वरील वर्णनाचा तरुण कुणाच्या नजरेस पडल्यास निफाड पोलीस स्टेशन ० २५ ५० २२ १० ३३ या नंबर वर संपर्क साधावा,

युवा महोत्सवातून युवक कलाकारांनी करिअर करावे

जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन; निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांचे प्रतिपादन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर (प्रतिनीधी) : शासन स्तरावरून युवकांसाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. करिअरच्या कक्षा दिवसेंदिवस रुंदावत आहेत. करिअरची क्षेत्रे वाढताहेत तसे मार्ग उपलब्ध होत आहेत. मात्र त्याची निवड करताना आपल्यातील क्षमता ओळखल्या पाहिजेत. विविध सुप्तगुणांनी व्यासपीठ देण्याच्या संधी शासनाच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. अशा कलाकारांनी युवा महोत्सवातून करिअर करावे. असे निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी सांगितले.

क्रीडा व युवक सेवा, संचालनालय पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन दि. ०१ ते ०२ डिसेंबर २०२४ या कालावधीत निर्मलकुमार फडकुले सभागृह व दयानंद शिक्षण शास्त्र सोलापूर येथे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विविध स्पर्धा पार पडल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या विविध भागात उदयास आलेली लोकनृत्य, व लोकगीते, काही तरुणांनी सादर केली. तसेच वकृत्व स्पर्धा, कथा लेखन, कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकला स्पर्धेतील चित्राचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

या जिल्हास्तर युवा महोत्सवाचे उदृघाटन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, जिल्हा युवा अधिकारी अजित कुमार, दयानंद शिक्षण शास्त्र महाविदयालय प्राचार्य एस.बी. क्षीरसागर, राज्य क्रीडा मार्गदर्शक गणेश पवार, क्रीडा अधिकारी नदिम शेख, सुनिल धारुरकर, दशरथ गुरव, प्रमोद चुंगे, खंडू शिंदे, आदी मान्यवर उपस्थित होते.

दयानंद शिक्षण शास्त्र महाविदयालयास सर्वसाधारण विजेतेपद पटकवण्याची काम गिरी केली. सौरभ वाघमारे –गोल्डनबॉय व श्रेया माशाळ–गोल्डन गर्ल मानकरी ठरले तर उत्कृष्ठ संघ व्यवस्थापक श्रीमती. बी. एस. राठोड यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्हास्तर युवा महोत्सवातील स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तज्ञ प्रशिक्षक पंचाची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये डॉ. पंकज पवार, डॉ. सिध्दार्थ सोरटे, डॉ. मैत्रय केसकर, डॉ. केतकी रानडे, मनोज अंकुश, राजेश पवार, किरण लोंढे, संगमेश्वर बिराजदार, विशाल चव्हाण, रंजन पचवाडकर, सुमित भोसले, यांनी काम पाहिले. विजेत्या स्पर्धक कलाकारांना पारितोषिक, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचा अंतिम निकाल – प्रतिक हणमंत तांदळे– चित्रकला –प्रथम. सचिन राम घंटे– चित्रकला– द्वितीय. शुभम अशोक गुळसकर– चित्रकला –तृतीय. साक्षी जितेंद्र सुरणा– काव्यलेखन– प्रथम. श्रेया प्रभाकर माशाळ– काव्यलेखन– द्वितीय

सौरथ तुळशीराम वाघमारे– काव्यलेखन– तृतीय. ॲलीस वेणुगोपाल मंदापुरे– कथालेखन– प्रथम

सेजल संतोष कवठेकर– कथालेखन– द्वितीय. आरती गुंडेराव मोहिते– कथालेखन– तृतीय. पर्जन्या निल अंजुटगी– वक्तृत्व– प्रथम. सौरभ तुळशीराम वाघमारे– वक्तृत्व– द्वितीय. श्रेया प्रभाकर माशाळ– वक्तृत्व–

तृतीय. स्वरा संगीत विद्यालय दमाणी नगर, सोलापूर– लोकगीत– प्रथम. संगमेश्वर कॉलेज सोलापूर–लोकगीत– द्वितीय. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर– लोकगीत– तृतीय. दयानंद मुलींचे वसतीगृह, सोलापूर–लोकनृत्य– प्रथम. शिवांश कला अकादमी, सांगोला– लोकनृत्य– द्वितीय. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर– लोकनृत्य– तृतीय– विशाल घंटे– छायाचित्रण– प्रथम. शुभम गुळसकर –छायाचित्रण– द्वितीय. अजय इंगळे– छायाचित्रण–तृतीय. सौरभ वाघमारे– उत्कृष्ठ कलाकार (मुलगा) . श्रेया माशाळ– उत्कृष्ठ कलाकार (मुलगी) . डॉ. बी. एस. राठोड (दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय) –उत्कृष्ठ संघ व्यवस्थापक. दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालय सोलापूर– सर्वसाधारण विजेते पद मिळाले असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली.

दूरदुष्टी, सर्वसमावेशक आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांना मंत्रिमंडळात संधी मिळावे : वनिता खेडगी- दोडमनी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट / प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातून मंत्रिमंडळाम ध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी हे प्रबळ दावेदार आहेत गेल्या अडीच वर्षांत अक्कलकोट तालुक्याचे सर्वांगीण विकास कामे केली आहेत,तालुक्यातील रस्त्यांचे जाळे निर्माण करून एक आदर्श निर्माण केला आहे .सोलापूर जिल्ह्यातील सर्वात मोठा मतदारसंघ असलेल्या अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून कल्याण शेट्टी यांनी विक्रमी मताधिक्याने विजय मिळवलेला आहे. सोलापूर ग्रामीण जिल्हा अध्यक्ष म्हणून सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी उत्तमरीत्या काम करून पक्ष तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी मोलाचं वाटा आहे.

अशा सर्वसमावेशक नेतृत्व म्हणजे सचिन कल्याणशेट्टी होय मंत्रीमंडळात संधी मिळायला हवे अशी मागणी अक्कलकोट येथील सामाजिक कार्यकर्त्या वनिता खेडगी दोडमनी यावेळी केली

सचिन दादा एक शांत संयमी युवा नेतृत्व आहे दादा मंत्री झाले तर स्थानिक लोकांना पुणे मुंबईहून खास मतदानासाठी यावं लागणार नाही तर इथेच राहून ते मतदार मतदान करतील दादांवर इतका विश्वास आहे दादा नक्कीच सोलापूर जिल्ह्यात आयटी पार्क आणि इतर मोठे उद्योग आणतील दीर्घकाळानंतर आपल्या जिल्ह्याला दुरदुष्टी असलेला युवा नेता लाभला आहे म्हणून मंत्रीपद हे दादाला संधी मिळावे हि प्रत्येक सर्व सामान्य कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

विरोधकांचा आरोपांचा अभ्यास करतोय : आ. सुभाष देशमुख

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु विधानसभा निवडणुकीच्या वेळेस सानिकांनी मला तिकीट मिळणार नाही अशी अफवा उठवल्या. मी निवडून येणार नाही असे दावा केला गेला. विरोधकांनी माझ्यावर अनेक आरोप केले हे सर्व बाबींची मी आता अभ्यास करीत आहे अशी प्रतिक्रिया आमदार सुभाष बापू देशमुख यांनी व्यक्त केली.

दक्षिण सोलापूरच्या आमदार परी सर्वाधिक तिसऱ्यांदा निवडून आल्याबद्दल आमदार सुभाष बापू देशमुख यांचा दक्षिण सोलापूर पत्रकार संघटने कडून सत्कार करण्यात आला प्रारंभिक दक्षिण सोलापूर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष पंचायत श्री स्वामी व सल्लागार हमीदिन लांडगे यांच्यासह आमदार देशमुख यांच्या सत्कार करण्यात आला यावेळी व्यासपीठावर माजी सभापती डॉक्टर चंद्रकोंढा हवी नाळे भाजपचे तालुकाध्यक्ष संगपा किरके, हनुमंत कुलकर्णी, सरचिटणीस यतीन शहा उपस्थित होते.

आमदार देशमुख म्हणाली की मी निवडणुकीत कोणावरही टीका की टिपणी केली नाही केली नाही मी केलेल्या विकास कामाचा प्रचार केला गेल्या दहा वर्षात मतदार संघातील वीज रस्ते पाणी आरोग्य हे म

ूलभूत प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडवल्यामुळे जनतेने मला विक्रम मताने निवडून दिले आहे येणाऱ्या काळातही तालुक्यातील सिंचन प्रश्न सुटण्यासाठी सीमा भिमा जोड कालवा वडापूर येथे बॅरिगेटेड तालुक्यातील नवीन कालवे तसेच मंद्रूप येथे एमआयडीसी गावोगावाचे प्रलंबित पाणी प्रश्न आरोग्य अशा समस्या सोडण्यासाठी प्रयत्न करणारा नेते मतदारसंघात ठळक दिसेल असे काम करणार आहे येणाऱ्या काळात सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात राज्यात त्याचा आदर्श ठरेल असे काम करण्याचा प्रयत्न करणार आहे पत्रकाराने वास्तवतेचे भान ठेवून विकास काम ाकडे लक्ष देणे गरजेचे आहे जाण नसलेल्या लोकांकडून करण्यात येणारे आरोपांना महत्त्व देणे टाळणे गरजेचे आहे तालुक्याच्या विकासाचे प्रश्न मांडल्यावर यातून दिशा मिळणार आहे असेही ते म्हणाले. यावेळी जेष्ठ पत्रकार राजकुमार सरोळे प्रशांत कटारे, नितीन वारे, शिवराय मुंगळे, दिनकर नारायणकर, बालाजी वाघे, निर्मला गुरव, बबलू शेख, अशोक सोनकठले महेश पवार, अरिफ शेख, शेवया स्वामी, पप्पू देशमुख, बनसिद्ध देशमुख, आनंद बिराजदार उपस्थित होते सूत्रसंचालन अभिजीत जळकोट यांनी केले.

मी कधीही पदाचा मोह केला नाही पक्षाने ही जबाबदारी दिली ती प्रामाणिकपणे पार पडली येणाऱ्या काळात पक्ष जी जबाबदारी देईल ती मी पार पडेल असे आमदार सुभाष बापू देशमुख यांनी मंत्री पदाबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समवेत महत्त्वपूर्ण बैठक: पत्रकारांच्या मागण्यांवर चर्चा!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई/प्रतिनिधी: मुंबईत नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने राज्याचे माजी आणि भावी महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समवेत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या चर्चेत पत्रकारांच्या अनेक महत्त्वपूर्ण मागण्यांचा आढावा घेण्यात आला.

महायुती सरकारने पत्रकारांच्या आर्थिक विकास महामंडळाची तसेच वृत्तपत्र विक्रेत्यांच्या महामंडळाची मंजुरी दिल्याबद्दल उपस्थित पत्रकारांनी अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली 'दीक्षा भूमी ते मंत्रालय संवाद यात्रा' सुरू करण्यात आली होती, या संवाद यात्रेची माहिती तसेच पत्रकारांच्या २२ मागण्यांवर ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे.

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी आश्वासन दिले की लवकरच प्रलंबित मागण्या मार्गी लावल्या जातील. त्यांनी ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी तसेच सोशल मीडियाच्या नियमनासाठी शासन धोरणात्मक निर्णय घेईल, असे सांगितले. विखे पाटील यांनी पत्रकारांचा लोकशाहीतील योगदान अधोरेखित करताना पत्रकारांना चौथ्या स्तंभाचे महत्त्व पटवून दिले. शासनाला नेहमीच पत्रकारांचे

सहकार्य लाभले असून, महायुती सरकार पत्रकार हिताचे निर्णय घेत राहील, असे त्यांनी नमूद केले. या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे ठाणे ग्रामीण जिल्हा उपाध्यक्ष आणि दैनिक समर्थ गांवकरी ठाणे ग्रामीण जिल्हा प्रतिनिधी सुभाष विसे यांच्या शुभहस्ते ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा शाल, पुष्पगुच्छ, खोबऱ्याचा हार आणि साईबाबा मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी पेढा भरवून त्यांचा सत्कार केला. संघटनेच्या वतीने पत्रकारांच्या मागण्यांसाठी ठोस पावले उचलली जातील, असे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी सांगितले. ही बैठक पत्रकारांसाठी अत्यंत फलदायी ठरली असून, आगामी काळात शासन पत्रकारांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

येत्या शनिवारी स्वेरीत 'ऋणानुबंध–२०२४' या माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संस्थेच्या अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील माजी विद्यार्थ्यांचा 'ऋणानुबंध–२०२४' हा मेळावा येत्या शनिवार, दि.०७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वेरीच्या प्रांगणात आयोजित केला आहे. यासाठी स्वेरीतून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.' असे आवाहन स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले आहे.

डिप्लोमा, डिग्री अभियांत्रिकी, फार्मसी व एमबीए चे शिक्षण झाल्यानंतर विद्यार्थी हे विविध ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने स्थायिक होतात. गोपाळपूरच्या माळरानावर जिथे विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले त्या ठिकाणी होणाऱ्या या 'ऋणानुबंध २०२४' या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात मनमुराद चर्चा, आपापसांत सुसंवाद, नव्या विचारांबरोबरच जुन्या आठवणींच्या शिदोरीची देवाण–घेवाण होणार असून आपण काम करत असलेल्या कंपनीत अथवा नोकरीत येत असलेले अनुभव यांचीही देवाण घेवाण होणार आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, स्वेरी इंजिनिअरिंगच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर, उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके व सचिव प्रा. अविनाश मोटे यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे.' असे आवाहन केले आहे. सदर मेळाव्यातून जुन्या आठवणींना उजाळा मिळणार आहे तसेच गतकाळात घडलेल्या प्रमुख घटनांचा आढावाही घेण्यात येणार आहे. या मेळाव्यात पदवी अभियांत्रिकीच्या स्थापनेपासून म्हणजे १९९८ पासून ते गतवर्षीपर्यंत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्वेरीमध्ये इंजिनिअरींगचे शिक्षण पुर्ण केल्यानंतर नोकरीच्या निमित्ताने विद्यार्थी पुणे, मुंबई, बेंगलोर तसेच भारतातील अन्य प्रमुख शहरांमध्ये व परदेशात स्थायीक झालेले माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहेत. एकूणच 'ऋणानुबंध २०२४' च्या निमित्ताने येत्या शनिवारी (दि.०७ डिसेंबर) पुन्हा एकदा स्वेरीतील जुना चिवचिवाट मात्र नव्याने घुमणार आहे हे मात्र नक्की! माजी विद्यार्थी मेळाव्यासंबंधी अधिक माहीतीसाठी ९९२३४०३७०८, ९८८१७७६१९६, ९९७५३९१०४८ व ९९७०८४९५८८ या क्रमांकावर संपर्क साधावा.' असे आवाहन करण्यात आले आहे.

बार्टी प्रशासनाच्या वतीने नियोजन

बार्टी संस्थेचे महासंचालक श्री. सुनिल वारे यांची माहिती

महापरिनिर्वाण दिनी बार्टी अनुयायांना अल्प दरात पुस्तके उपलब्ध करून देणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे/प्रतिनीधी : भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर येथे अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो आंबेडकरी बांधव अनुयायी येत असतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने महामानवास अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांना चैत्यभूमी, दादर येथील शिवाजी पार्क मैदानातील बार्टी पुस्तक विक्री केंद्रावर बार्टी संस्थेचे महासंचालक श्री सुनिल वारे यांच्या निर्देशानुसार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, बुद्ध आणि त्यांचा धम्म, जाती व्यवस्थेचे निर्मूलन, भारताचे संविधान, शूद्र पूर्वी कोण होते, जनता, मूकनायक, महामानव आदी पुस्तके तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर व ईतर महापुरुषांच्या जिवनावरिल मौल्यवान पुस्तके अल्प दरात मूळ किमतीच्या १५ % दरात अनुयायांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

बार्टी संस्थेच्या वतीने अनुयायींना आवश्यक त्या सुविधा त्वरित उपलब्ध करून देण्याचे निर्देश बार्टी संस्थेचे महासंचालक श्री. सुनिल वारे यांनी बार्टी प्रशासनास दिले आहेत.

महामानवास विनम्र अभिवादन करून भीम अनुयायी बार्टी पुस्तक विक्री केंद्रावर पुस्तके खरेदी करण्यासाठी प्रचंड गर्दी करत असतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे पुस्तके बार्टी १५% दरात उपलब्ध करून देते त्यामुळे हजारो अनुयायी, विद्यार्थी, नागरिक, संशोधक, महिला रांगेत उभे राहून पुस्तके खरेदी करून महामानवास विनम्र अभिवादन करतात.

पुस्तक स्टॉलवरील गर्दी लक्षात घेता गर्दीचे नियंत्रण करून अनुयायांच्या सोयीसाठी दिनांक ५ व ६ डिसेंबर २०२४ रोजी बार्टी प्रशासनाच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे.

भीम अनुयायांनी बार्टी पुस्तक विक्री केंद्राला भेट देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर व अन्य महापुरुषांचे पुस्तके खरेदी करावेत गर्दीमुळे नेटवर्क जाम असतात त्यामुळे online पेमेंट होत नाही अशावेळी ऐनवेळी गैरसोय होऊ नये म्हणून रोख रक्कम सोबत आणण्याचे महासंचालक यांनी आवाहन केले आहे.

थोडक्यात...

जीवे मारण्याची धमकी

सोलापूर : थुंकल्याच्या कारणावरून शिवीगाळ करून चाकूने वार करत जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३० नोव्हेंबर रोजी रात्री जुना पुना नाका येथे घडली. याप्रकरणी संभाजी अप्पाजी कोडगे (वय-३१,रा.हांडे प्लॉट,संभाजी महाराज चौक) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून गणेश सुधारक शिंदे (वय-५०,रा.अभिमान श्री नगर, मुरारजी पेठ) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे मोटार सायकल वरून जात असताना वरील संशयित आरोपी याने फिर्यादी यांना आडवून तु माझ्याकडे बघून का थुंकला या कारणावरून शिवीगाळ करत चाकुने वार केला. त्यावेळी तो वार फिर्यादी यांनी हुकवला. तसेच फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पो.ना. भद्रशेट्टी हे करीत आहेत.

मार्कंड वाडीतील बॅलेट पेपरवर वोटिंगची प्रक्रिया रद्द

मतदान प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय घेतला : आ. उत्तम जानकर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
पंढरपूर/प्रतिनिधी

मार्कंड वाडीतील बॅलन्स पेपर वोटिंग ची प्रक्रिया रद्द मतदान प्रक्रिया थांबवण्याचा निर्णय घेतला उत्तम जानकर. बॅलेट साठी आम्ही छातीवर बुलेट गेलो असा निर्धार व्यक्त करत मार्करवाडी गावात मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याचा निर्णय अखेर ग्रामस्थांकडून मागे घेण्यात आला आहे मार्कर वाडीतील बॅलेट पेपर द्वारे होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांकडून सोमवारी जमाबंदीचा आदेश लागू करण्यात आला होता.

त्यानंतर ही मार्करवाडी गावातील ग्रामस्थ मतदान प्रक्रिया राबवण्यावर ठाम होते त्यानुसार आज सकाळी मार्करवाडी ग्राम पंचायत ही बाहेर नागरिकांची जमवाजमह सुरू झाली होती मात्र पोलिसांनी दिलेल्या निर्वाणीच्या इशाऱ्यानंतर शरद पवार गटाचे आमदार उत्तमराव जानकर यांनी ग्रामस्थाची चर्चा करून येथील बॅलेट पेपर वोटिंग ची प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला यावर उत्तम कारखान्यांनी प्रसार माध्यमाची संवाद साधला.

आम्ही पोलिसाबाबत बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्यासाठी चर्चा केली. त्यांनी सांगितले की तुम्ही एक मतदान केले तर आम्ही मतपत्रिका आणि इतर साहित्य जप्त करू.आम्ही अगोदरच १४४ कलम लागू केली आहे त्यामुळे तुम्हा सर्वांवर गुन्हा दाखल केला जाईल अशी पोलिसांनी उत्तम राव जानकर यांना सांगितले. यानंतर आपण ग्रामस्थांशी चर्चा केल्याचे उतना जाणकारी यांनी सांगितले जर पोलीस मतदान करू देणार नसतील तर काय फायदा? आपण पेट्या धरून ठेवणार ते इसकावून घेणार त्यामुळे गोंधळ होऊन जटापट उडेल यामध्ये मतदानासाठी आलेली लोक निघून जातील असे ग्रामस्थांचे म्हणणे पडले त्यामुळे तूर्तास आम्ही हे मतदान प्रक्रिया थांबण्याचा निर्णय घेतल्याचे उत्तम राव जानकर यांनी सांगितले.

मार्करवाडी गावात पंधराशेच्या आसपास मतदान झाल्याशिवाय निकाल येणार नाही या गावात मला मतदान होणार होते मात्र आता पोलीस बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याला विरोध करत आहेत आता आम्ही मोर्चे काढून हा मुद्दा प्रांत अधिकारी आणि निवडणूक आयोगामार्फत पोचलो आपण हा उत्तमराव जानकर न्याय मिळाल्याशिवाय थांबणार नाही असे जानकर यांनी म्हटले आहे माझ्या अभ्यासानुसार मला या गावात चौदाशे आणि समोरच्याला ५०२ इतकी मते पडली पण निकालाच्या वेळी समोरच्या उमेदवाराला मार्करवाडीतून एक हजार तीन मते पडल्याने समोर आले व समोरच्या उमेदवाराला दुप्पट मतदान झाले असा आरोप जानकर यांनी केला.

प्रवीण बागडे यांना माफसूचा उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
नागपुर /प्रतिनीधी

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग १ व २ अधिकाऱ्यांमधुन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या संचालक, विस्तार व शिक्षण विभागातील कार्यरत वरिष्ठश्रेणी लघुलेखक/स्विय सहायक श्री प्रविण मोरेश्वर बागडे यांना २०२३-२४ या वर्षाकरीता 'उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार' रजत जयंती सभागृह, पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर येथे विद्यापीठ वर्धापन दिन निमीत्त आयोजित सोहळयात प्रदान करण्यात आला. तसेच यावेळी त्यांना पुरस्कारसह प्रमाणपत्र, शाल-श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार विद्यापीठ मुख्यालय अधिनस्त घटक महाविद्यालये/प्रक्षेत्रे/संस्थेमधील २०२३-२४ या वर्षाकरीता वर्ग १ व २ संवर्गातून विद्यापीठ कार्यक्षेत्रातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या एक शिक्षकेत्तर अधिकारी, तसेच वर्ग ४ संवर्गातील कर्मचाऱ्यास पुरस्कार देऊन सम्मानित करण्यात आले. सदर पुरस्काराचे उद्दिष्ट म्हणजे विद्यापीठ तसेच विद्यापीठ अधिनस्त घटक महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या उत्कृष्ट कार्याची नोंद घेणे, कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सेवा तत्परता व विद्यापीठाप्रती आत्मीयता वाढविणे, कर्मचाऱ्यांमध्ये उत्कृष्ट आणि असाधारण योगदान देण्याची भावना जोपासने व त्यांची कार्यक्षमता वाढविणे असे आहे.

श्री. बागड़े यांनी नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील दूधबर्डी येथे २० हेक्टर शासकिय जमीन संपादित करून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रासाठी शासन निर्णय काढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. यापूर्वी त्यांना २०१७-१८ करिता उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कारआणि २०२३ मध्ये 'लम्पी योध्दा' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. ते महाराष्ट्रातील अनेक मंत्र्यांकडे स्वीय सहाय्यक म्हणुन कार्यरत होते. शासन आणि प्रशासनाच्या अनुभवासोबतच त्यांना समाजसेवा आणि साहित्याचीही आवड आहे. त्यांनी कोविड अंतर्गत अनेक रुग्णांची सेवा सुध्दा केली आहे. तसेच त्यांचे महाराष्ट्रातील विविध वृत्तपत्रांमध्ये विविध विषयांवर २५० वर लेख तसेच १०० वर मुलाखती/स्तंभ सुध्दा प्रकाशित झाले आहेत.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. नितीन पाटील, जैवतंत्रज्ञान विद्यापीठ, हैद्राबादचे डॉ. नियाज अहमद, मुख्य वनसंरक्षक आणि क्षेत्रसंचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपुरचे डॉ. जितेंद्र रामगांवकर, पशुविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक (संशोधन) डॉ. नितिन कुरकुरे, संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. अनिल भिकाने, अधिष्ठाता (निम्न शिक्षण) डॉ. सचिन बोंडे, डॉ. कुलसचिव श्रीमती मोना ठाकुर, नियंत्रक (वित्त व लेखा) श्रीमती मनीषा शेंडे, विद्यापीठ ग्रंथपाल श्री सुनील गावंडे, विद्यापीठ अभियंता श्री. आरिफ शेख, परीक्षा नियंत्रक डॉ. भूषण रामटेके, नागपुर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ आरजु सोमकुवर, मत्स्य महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, डॉ. मुकुंद आमले आदींच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल त्यांचे अनेक स्तरावरून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन उपकुलसचिव (आस्थापना) डॉ अजय गावंडे यांनी मानले.

मनसे नेते दिलीप बापू धोत्रे मित्रपरिवार यांच्या वतीने नूतन आमदार अभिजीत पाटील यांचा सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप धोत्रे मित्रपरिवार यांच्या वतीने माढाचे नवनिर्वाचित आमदार अभिजीत (आबा) पाटील यांचा पंढरपूर येथील मनसे कार्यालयात सत्कार सन्मान करण्यात आला.

यावेळी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात हलगीच्या कडकडात आणि फटाक्यांची आताच बाजी करून आमदार अभिजीत पाटील यांना क्रेनच्या साह्याने मला मोठा हार घालून सत्कार करण्यात आला यावेळी बोलताना दिलीप बाबू धोत्रे म्हणाले की अभिजीत पाटील यांनी केलेल्या कामाची पोचपावती नागरिकांनी त्यांना आमदार म्हणून करून दिले आहे.

यावेळी अभिजीत पाटील मनाली की हा सन्मान हा माझा घरचा सन्मान स्वीकारत असल्याची त्यांनी सांगितले मी या परिसरात लहानाचा मोठा झालो या परिसरातील नागरिकांनी माझी जडणघडण केली आहे. व पुढे म्हणाले की स्व. भारत नाना भालके नंतर जनतेने मला स्वीकारले आहे पुढील पंढरपूर नगरपालिका निवडणूक लढवून शहराच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी मी आमदार माळ्याचा जरी असलो तरी पंढरपुरातील नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद तालुक्याच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याची त्यांनी सांगितले.

झाडे लावून साजरा केला वाढदिवस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट स्टेशन : अक्कलकोट तालुक्यातील जेऊरवाडी ग्रामपंचायत सदस्य रोहित भालेराव यांनी आपला एकतीसावा वाढदिवस झाडे लावून साजरा केला. तसेच प्रत्येक वर्षी झाडे लावून वाढदिवस साजरा करण्याचा यावेळी संकल्प केली. झाडे

दरवर्षी झाडे लावून वाढदिवस साजरा करण्याचा केला संकल्प

जगविण्याकरिता संगोपनाची जबाबदारी वेळी घेण्यात आली.

ग्रामपंचायत सदस्य रोहित भालेराव यांनी स्वखर्चाने जेऊरवाडी ग्रामपंचायत बाजूला फणस,जांभूळ,अशोक, केशर आंबे याची झाडे लावले,झाडांना सुरक्षा करिता जाळी लावून झाडांना ड्रीप द्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली यावेळी तंटामुक्त अध्यक्ष श्रीमंत राठोड, पोलीस उपनिरीक्षक बाबू राठोड,उपसरपंच वृषाली भालेराव, पोलीस पाटील विजय चव्हाण, ग्रा स रोहित भालेराव, संजय राठोड,मनोहर जाधव, ग्रां स विजय भालेराव, प्रताप चव्हाण, नामदेव राठोड,काशिनाथ राठोड, नंदराम चव्हाण, हरिश्चंद्र राठोड, रामू पवार,विजय राठोड, सुभाष चव्हाण, संतोष जाधव आदी उपस्थित होते.

मंत्रिमंडळाच्या शपथविधीला युवा भीमसेनेचा तीव्र विरोध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर/प्रतिनिधी : यापूर्वी देखील संघ व भाजप सहा६ डिसेंबर रोजी बाबरी मज्जिद पाडली होती तेव्हाच संघ व भाजपचा आंबेडकरवादी विरोध चेहरा समोर आला होता भाजपने ही कार्यक्रम सहा६ डिसेंबर नंतर घेण्यात यावा अशी मागणी राज्यपालांना आयोजक करत आहेत६ डिसेंबर रोजी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातील अनुयायी तीन३ डिसेंबर पासून लाखोच्या संख्येने मुंबईत येत असतात या अन्यायासाठी मुंबई महानगरपालिका व पोलीस प्रशासन रेल्वे प्रशासन मोठ्या प्रमाणावर तैनात केले जाते ५ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाची शपथविधी कार्यक्रम घेतल्यास संपूर्ण यंत्रणेवर या कार्यक्रमाचा तणाव येईल पर्यायाने आंबेडकर अनुयायाचा सुविधा तसेच कायदा व सुव्यवस्थेवर याचा परिणाम होण्याची शक्यता आहे आणि आसामाजिक तत्वाकडून याचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे देशाचे राष्ट्रपती पंतप्रधान महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्राचे राज्याचे पोलीस महासंचालक आणि अस्तित्वात येणार सरकारने याची दखल घेऊन ही कार्यक्रम पूर्वनियोजन प्रमाणे सहा६ डिसेंबर नंतर घ्यावा अशी मागणी युवा भिमसेना महाराष्ट्र राज्य लातूर युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे यांनी केले आहे. या निवेदनावर महिला जिल्हाध्यक्ष उमाताई आदमाने करण सोनटक्के यांच्या स्वाक्षरी आहेत.

खेडे येथून महिला बेपत्ता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क
निफाड/प्रतिनिधी

निफाड तालुक्यातील खेडे येथील रहिवासी आशाबाई त्रंबक महाले वय ५० वर्ष ह्या दिनांक २५/ ११/ २०२४ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घरात कोणास काही एक न सांगता निघून गेल्या ची माहिती त्यांचे पती त्र्यंबक अन्साराम महाले यांनी निफाड पोलीस स्टेशनला दिली आहे.

आशाबाई त्रंबक महाले वय ५० वर्षे या शरीराने सडपातळ असून रंगाने सावळ्या आहेत तर चेहरा उभट ,केस काळे सफेद लांब आहेत, डोळे काळे ,नाक सरळ असून अंगात नऊवारी हिरव्या रंगाची फुलांच्या नक्षीची साडी आहे ,चेहरा किंचित वाकडा असून कपाळावर गोंधन, पायात चपला आहेत या घटनेची नोंद निफाड पोलीस स्टेशनला करण्यात आली ,असून पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार एन एन साळवे हे करीत आहे, वरील वर्णनाची महिला कोणाच्या नजरेस पडल्यास निफाड पोलीस स्टेशन ० २५ ५० २२ १० ३३ या नंबर वर संपर्क साधावा.

निफाडला इस्रोच्या अंतरिक्ष महायात्रेस शिक्षक व विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद

असंख्य विद्यार्थ्यांनी लुटला महायात्रेचा आनंद

आज की ताजा खबर... सूर्य पृथ्वीवर धडकला

निफाड/प्रतिनिधी : आज की ताजा खबर.. सूर्य पृथ्वीवर धडकला. हुर्रे...

आर्या !!! हा आर्यभट बघ.... ए बघ ना, किती छान दिसत आहे,ही पृथ्वी... आपण पृथ्वीवर इथं असू... मंगळावर कसे जात असतील गं... हे बघ चंद्रयान -३... असे एक ना अनेक उद्गार विद्यार्थ्यांच्या मुखातून दिवसभर बाहेर पडत होते. निमित्त होते भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रो व विज्ञान भारती यांनी आयोजित केलेल्या स्पेस ऑन व्हील या अंतरिक्ष महायात्रेचे.

या महायात्रेचा मनमुराद आनंद लुटत असंख्य विद्यार्थ्यांनी व त्यांच्या समवेत आलेल्या शिक्षकांनी या महायात्रेस प्रचंड प्रतिसाद दिला.

चेहऱ्यावर पसरलेली अत्यंत कमालीची उत्सुकता, शिगेस पोहोचलेली अपार जिज्ञासा, ओसंडून वाहणारे हास्य, खुला संवाद आणि आनंदी आनंद एकूणच स्पेस ऑन व्हील अर्थात अंतरिक्ष महायात्रा ही आज निफाडकरांची व विद्यार्थ्यांची मुख्य आकर्षण ठरली.

स्व. प्र. पु. तथा बाबासाहेब वैशंपायन पूर्वाध्यक्ष दि एन ई आय नाशिक यांचे २०२३-२४ हे जन्म शताब्दी वर्ष त्यानिमित्ताने दि.एन.ई.आय.चे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन यांचे मार्गदर्शनाखाली निफाड शहरातील निफाड इंग्लिश स्कूल, निफाड येथे इस्रोच्या सर्व अंतराळ मोहिमांची माहिती देणारी फिरती बस निफाड च्या पंचक्रोशीतील शाळेसाठी उपलब्ध करून देण्यात आली.

अंतराळ महायात्रेची बस येताच शालेय विद्यार्थ्यानी स्वागत केले. निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बागुल यांच्या अध्यक्षतेखाली फीत कापून सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. स्पेस ऑन व्हीलच्यावतीने आलेले अफजलखान व सलीम खान यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून निफाड शहराच्या नगराध्यक्षा डॉ. कविता धारराव, निफाड इंग्लिश स्कूलचे चेअरमन ऍड प्रवीण ठाकरे, सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलाल चोरडिया, प्रवीण कराड, केंद्रप्रमुख अहिरे , विस्तार अधिकारी जगताप , निफाड इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अरुण महाजन , सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका बागडे , इस्रोचे समन्वयक योगेश भारद्वाज, सोनवाडी माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनीता बाजपेयी, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सुरेंद्र पगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी तालुक्यातील अनेक शाळांनी उपस्थिती लावून या अंतराळयात्रेचा आनंद लुटला. चंद्रयान मोहीम, मंगळयान मोहीम, अंतराळात सोडलेले उपग्रह, इस्रोचा आजपर्यंतचा यशस्वी प्रवास विद्यार्थ्यांनी अनुभवला. या महायात्रेस अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या सांस्कृतिक प्रमुख वंदना खैरनार यांनी केले लेझिम पथकाला शेख शगुफ्ता यांचे मार्गदर्शन लाभले,सुंदर फलक लेखन राज्य पुरस्कार विजेते राजेश सावंत यांनी केले तर आभार पर्यवेक्षक कैलास सोनवणे सर यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते, एकूण निफाड तालुक्यातील ४२ शाळेतील पाच हजार मुलांनी प्रदर्शनाला भेट दिली. .